# १० ततिय संगीति कथासंक्खेपो

(पालि साहित्यामध्ये तीसऱ्या संगितीला फार महत्त्व आहे. कारण या तीसऱ्या संगितीमध्ये पालि तिपिटकाचे अंतीम स्वरूप निश्चित करण्यात आलेले होते. ही तीसरी संगिती पाटलीपुत्त (पटणा, बिहार) येथे महान सम्राट अशोकाच्या काळामध्ये आयोजित करण्यात आलेली होती. अशोक गुरू व महान आचार्य भदंतमोग्गल्लिपुत्ततिस्स हे या संगितीचे अध्यक्ष होते. या संगितीला सम्राट अशोकाचे संपूर्ण राजकीय संरक्षण प्राप्त झालेले होते. ही संगिती इसवीसन पूर्व तीसऱ्या शतकामध्ये आयोजित करण्यात आलेली होती. या संगितीच्या आयोजनाच्या वेळी बौद्ध धम्मामध्ये वेगवेगळे विचार प्रवाह निर्माण झालेले होते. त्यांना नियंत्रित करण्यासाठी या संगितीच्या आयोजनाच्या वेळी केल्या गेलेले प्रयत्न फार महत्त्वाचे आहेत. ही संगिती ऐतिहासिक आहे. त्याच प्रमाणे पालि साहित्याच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहे.)



ततो परं अट्ठतिंसाधिकानि द्वेवस्ससतानि सम्मासम्बुद्धस्स भगवतो सासनं निराकुलं अहोसि निरब्बुंदा अट्ठतिंसाधिके पन द्विवस्ससते सम्पत्ते पाटलिपुत्तनगरे सिरिधम्मासोकस्स रञ्ञो नाम काले निग्गोधसामणेरं पटिच्च बुद्धसासने पसीदित्वा भिक्खूसंघस्स लाभसक्कारं बाहुल्लं अहोसि । तदा सट्ठिसहस्समत्ता तित्थिया लाभ सक्कारं अपेक्खित्वा अपब्बजिता पि पब्बज्जिता विय हुत्वा उपोसथ पवारणादिकम्मेसु पविस्सन्ति – सेय्यथा पि नाम हंसानं मज्झे वका, यथा च गुन्नं मज्झे गवजा, यथा च सिन्धवानं मज्झे गद्दभा ति।

तदा भिक्खूसंघो – ‘‘इदानि अपरिसुद्धा परिसा’ति मनसिकरित्वा उपोसथं न अकासि । सासने अब्बुदं हुत्वा सत्त वस्सानि उपोसथपवारणानि भिज्जन्ति । सिरिधम्मासोको च राजा तं सुत्वा – ‘‘तं अधिकरणं वूपसमेहि, उपासथं अकत्तुकामे किं करिस्सामी’’ ति, राजानं पटिपुच्छितुं अविसहताय सयं मूळ्हो हुत्वा, अञ्ञेन मूळ्हेन मन्तेत्वा – ‘सचे भिक्खूसंघो उपोसथं न करेय्य, भिक्खूसंघ घातेतुकामो महाराजा’’ति सयं मूळ्हो हुत्वा, मूळ्हस्स सन्तिका मूळ्हवचनं सुत्वा, विहारं गन्त्वा उपोसथं अकत्तुकामं भिक्खूसंघ घातेसि । राजा च तं सुत्वा – अयं बालो मया अजाणन्तो व हुत्वा ईदिसं लुद्दकम्मं अकासि । ‘‘अहं पापकम्मतो मुञ्चिस्सामि मा वा’’ति द्वेळ्हकजातो हुत्वा महामोग्गलिपुत्ततिस्सथेर गंगाय पटिसोततो आनेत्वा तं कारण थेरं पुच्छि । थेरो च दीपकतित्तिरजातकेन – ‘‘अचेतनंताय पापकम्मतो मोचेस्ससी’’ ति विस्सज्जेसि । सन्ताहं पि तित्थियानं वादं सिरिधम्मासोकरञ्ञो सिक्खायेसि। वादेन वादं तुलयित्वा सट्ठिसहस्समते तित्थिये सासना बाहिरं अकासि। तदा पन उपोसथं अकासि । भगवता वुत्तनियामेनेवं कथावत्थुं च भिक्खूसंघमज्झे व्याकासि । असोकारामे च सहस्समत्ता महाथेरा नवहि मासेहि संगायिंसु । तदा मज्झिमदेसे पाटलिपुत्तनगरे सिरिधम्मासोकरञ्ञो रज्जं पत्वा अट्ठारस वस्सानि अहेसुं ति ।

**(सासनवंसो पठमो परिच्छेदो मधून)**

---

**शब्दार्थ / सद्दत्थ**

**सम्मासम्बुद्धस्स** – सम्यक सम्बुध्दाचा.

**सम्पत्त (कृ.)** – पोहचलेला.

**पसीदि (पू.क्रि.)** – प्रसन्न झाला, श्रद्धाळू बनला.

**लाभ–सक्कार (पु.)** – लाभ आणि सत्कार.

**पब्बजिता** – प्रव्रज्जीत.

**मनसिकरोति (क्रि.)** – मनात ठेवतो, विचार करतो.

**अपरिसुद्ध (कृ.)** – अस्वच्छ, अशुद्ध, अपवित्र.

**निराकुल (वि.)** – निशंक, बाधारहित, समस्या नसलेला.

**पटिच्च (अं.पू.क्रि.)** – हेतूने, उद्देशाने.

**पसीदित्वा** – प्रसन्न होऊन.

**अपेक्खित्वा** – अपेक्षा धरून.

**पवारणा (स्त्री.)** – वर्षावासानंतर केला जाणारा एक धार्मिक संस्कार, निमंत्रण, संतोष.

**मनसिकरित्वा (पू.क्रि.)** – मनात ठेऊन, विचार करून.

**उपोसथ (पु.)** – महिन्यातील दोन्ही अष्टमी, अमावस्या व पौर्णिमा हे चार उपोसथाचे दिवस, उपोसथ, पातिमोक्खाच्या पाठाचा दिवस.

## स्वाध्याय

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

क) तिसरी सङ्गिती कुठे आणि कुणाच्या काळामध्ये आयोजित करण्यात आली होती ?

ख) तिसरी सङ्गिती किती महिने पर्यंत आयोजित करण्यात आली ?

ग) तिसऱ्या सङ्गितीमध्ये कोणत्या ग्रंथाची निर्मिती झाली ?

**प्रश्न २ : खालील पालि वाक्यांची घटनानुक्रमानुसार फेरमांडणी करा.**

१) मूळ्हस्स सन्तिका मूळ्हवचनं सुत्वा, विहारं गन्त्वा उपोसथ अकत्तुकामं भिक्खूसंघ घातेसि ।

२) अचेतनंताय पापकम्मतो मोचेस्ससी’’ति विस्सज्जेसि ।

३) तदा भिक्खूसंघो – ‘‘इदानि अपरिसुद्धा परिसा’ति मनसिकरित्वा उपोसथं न अकासि ।

४) थेरो च दीपकतित्तिरजातकेन ।

५) सासने अब्बुदं हुत्वा सत्त वस्सानि उपोसथ पवारणानि भिज्जन्ति ।